महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सार्थक कॉर्नर, कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र. :- ०२०-२५५०८८००
ई-मेल:- kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्र.:- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 9281 दिनांक:- 20/6/2024

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.१९/०६/२०२४

१. अपिलार्थी
श्री. बाबासाहेब अर्जुन कांबळे
राहणार :- सर्वे न १०/४ संभाजी नगर, बायपासचा राजा
गणपती मंदिराच्या पाठीमागे खराडी, पुणे-१४.
२.जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
कोंढवा- येवलेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

अपिलार्थी श्री. बाबासाहेब अर्जुन कांबळे
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे महानगरपालिका.

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल</u>**

अपिलार्थी यांनी दि. २६/०४/२०२४ रोजी मा. जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी कार्यालय यांचेकडे अर्ज करून मागणी केलेली माहिती .

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहार संबधीची माहिती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २६.०४.२०२४ | २४.०५.२०२४ | दि. २२/०५/२०२४ | - | - |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण – श्री. बाबासाहेब अर्जुन कांबळे यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे– दि. २६/०४/२०२४ रोजीचा माहिती अधिकार अर्जाची माहिती दिलेली नाही.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २४.०६.२०२४ | २७/०५/२०२४ | आहे | - | दि. १०/०६/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ | :- | दि. १९/०६/२०२४ रोजी दुपारी ११.३० वाजता. |
| सुनावणीस अपिलार्थी | :- | अनुपस्थित |
| सुनावणीस जन माहिती अधिकारी | :- | उपस्थित |

## विवेचन

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार २००५ अंतर्गत दि. २६.०४.२०२४ रोजी केलेल्या अर्जावर कोणतीही माहिती दिली नाही असे अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

अर्जदार यांनी नमूद केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यालयाकडील उपलब्ध अभिलेखे तपासले असता अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीच्या मुद्दा क्र. १ ते १० नुसार एकूण १,१०८/- प्रति होत असून प्रति पृष्ठ २/- रुपये प्रमाणे र.रु. २,२१६/- चे प्रमाणे शुल्क मनपा कोष कार्यालयात जमा केल्यानंतर सदरची माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी कळविले आहे.

तदनंतर अपिलार्थी श्री. बाबासाहेब अर्जुन कांबळे यांनी समक्ष कार्यालयात येवून इकडील कार्यालयाकडील आ. क्र. २०३३ दि. १८.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर कंपनी विषयी माझी काहीही तक्रार नसून मी केलेला अपील अर्ज दफ्तरी दाखल करण्यात यावा असे कळविले आहे.

## -: आदेश :-

अपिलार्थी श्री. बाबासाहेब अर्जुन कांबळे यांनी दिनांक २६.०४.२०२४ रोजी या कार्यालयाकडे माहिती अधिकार अर्ज केला आहे. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी दिनांक २२.०५.२०२४ ने माहिती अधिकार अर्जाचे उत्तर पत्राने कळविले आहे. माहिती अधिकार २००५ नुसार अपिलार्थी यांनी दिनांक २७.०५.२०२४ ला माहिती अधिकार अर्जावर कोणतीही माहिती दिली नाही असे सांगून प्रथम अपील दाखल केले.

अपिलार्थी श्री. बाबासाहेब अर्जुन कांबळे यांनी समक्ष कार्यालयात येवून इकडील कार्यालयाकडील आ. क्र. २०३३ दि. १८.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर कंपनी विषयी माझी काहीही तक्रार नसून मी केलेला अपील अर्ज दफ्तरी दाखल करण्यात यावा असे कळविले आहे.

सबब अपिलार्थी अनुपस्थित असून त्यांनी दाखल केलेल्या अर्जास अनुसरून सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

(हेमंत किरुळकर)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाण: १९/०६/२०२४, पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. श्री. बाबासाहेब अर्जुन कांबळे
राहणार :- सर्वे न १०/४संभाजी नगर, वायपासचा राजा
गणपती मंदिराच्या पाठीमागे खराडी, पुणे-१४.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता, कोंढवा येवलेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

Ok - श्री- ढोले
28/06/24

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......